# नगर - वेध

– ए. ए. कुलकर्णी

विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटी सदैव कटिबद्ध आहे. या संस्थेतील विद्यार्थी व पालकांसाठी आम्ही नेहमीच विविध उपक्रम राबवत असतो. आम्ही राबवत असलेल्या उपक्रमांचा लाभ समाजातील इतर विद्यार्थी व पालकांनाही व्हावा, या हेतूने गेल्या ८ वर्षांपासून विद्यार्थी व पालकांसाठी श्री. फिरोदिया ट्रस्ट पुरस्कृत स्व. नवलमलजी फिरोदिया स्मरणार्थ 'वेध' व्यवसाय प्रबोधन परिषद आयोजित केली जाते.

अहमदनगर शहराचे सुपुत्र प्रसिद्ध सिनेअभिनेते व प्रशालेचे माजी विद्यार्थी सदाशिव अमरापूरकर व सुनंदा अमरापूरकर यांनी मांडलेल्या 'वेध' कल्पनेला अहमदनगर एज्युकेशन सोसायटीने मूर्त रूप दिले. गेल्या आठ वर्षांपासून 'वेध' कार्यशाळेची लोकप्रियता इतकी वाढली की, जिल्ह्यातील, शहरातील, शाळा, पालक व इतरही क्षेत्रांतून या वर्षीचा कार्यक्रम कधी होणार अशी विचारणा सदैव केली जात असते.

पालक व समाजाचा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा बहुतांशी बुद्धीगुणांवर अवलंबून आहे. त्या प्रकारची वागणूक विद्यार्थ्यांना कुटुंबातून व समाजातून मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. सर्व विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक एकसारखा असू शकत नाही हे नैसर्गिक सत्य आहे. शालेय अभ्यासाव्यतिरिक्त इतरही अनेक गुण विद्यार्थ्यांमध्ये असतात ते ओळखून त्यांची जोपासना, कदर करण्याची खरी गरज आहे.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर आपली सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती चांगलीच हवी असा ही समज समाजामध्ये रूढ झाला आहे; परंतु खडतर कष्टदायी जीवनात परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठणाऱ्यांची संख्याही समाजात कमी नाही, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

जीवनात यशस्वी होण्यासाठी शालेय अभ्यासासह इतरही अनेक क्षेत्र आहेत, याची जाणीव पालकांना व विद्यार्थ्यांना होणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांचा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन व विद्यार्थ्यांचा स्वत:कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. या हेतूने जीवनात यशाचे शिखर गाठणाऱ्या विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्त्वांनी जर प्रत्यक्ष आपले अनुभव पालक व विद्यार्थ्यांसमोर कथन केले, तर त्यातून प्रेरणा घेऊन पालक व विद्यार्थी यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो हाच उद्देश मुळाशी धरून आम्ही हा उपक्रम राबवत आहोत.

नगर 'वेध'च्या पहिल्याच वर्षी

श्री. मकरंद अनासपुरे, भरत जाधव (सिने अभिनेते), डॉ.






बीना इनामदार, डॉ. वसंत संख्ये (शिक्षणतज्ज्ञ), डॉ. नरेंद्र जाधव (कुलगुरू, अर्थतज्ज्ञ), श्री. सदाशिव अमरापूरकर (अभिनेते) या मान्यवरांच्या मुलाखतीतून विद्यार्थ्यांच्या पुढे एक अनोखा पट उलगडला गेला. आणि सुरू झाला सिलसीला नगर वेधचा.

आजपर्यंत नगर 'वेध'च्या व्यासपीठावर आलेल्या मान्यवरांच्या मांदियाळीकडे नजर टाकली की, आपणास लक्षात येईल की, किती समृद्ध अनुभवांची भेट आमच्या विद्यार्थ्यांना झाली.

श्री. विठ्ठल कामत (सुप्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक), श्री. दिलीप रांजेकर (संचालक, अझीम प्रेमजी फाऊंडेशन, बंगलोर), श्रीमती मनिषा म्हैसकर (महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महाराष्ट्र राज्य), श्री. राघवेंद्र गायकैवारी (संचालक, हायटेक बायोलॅब्ज, पुणे.), श्रीमती अपर्णा वेलणकर (सहसंपादक, लोकमत, नाशिक), श्री. जॉनी लिव्हर (सिने कलावंत), श्री. अच्युत गोडबोले (नामवंत संगणक तज्ज्ञ), श्री. अवधुत गुप्ते (प्रसिद्ध गायक, संगीतकार), श्रीमती डॉ. संध्या पुरेचा (नृत्य कलावंत), श्री. धनराज पिल्ले (नामवंत हॉकीपटू), डॉ. अनिल अवचट (सुप्रसिद्ध लेखक), डॉ. अभय बंग (जागतिक कीर्तीचे सामाजिक कार्यकर्ते), डॉ. किशोर चौकार (मॅनेजिंग डायरेक्टर, टाटा इंडस्ट्रीज लि.), श्री. शशांक दळवी (पक्षी मित्र), श्री. चंद्रकांत पंडीत (माजी क्रिकेटीयर, भारतीय क्रिकेट संघाचे यष्टीरक्षक), डॉ. सलील कुलकर्णी (संगीतकार), श्रीमती सोनाली कुलकर्णी (नाट्य, चित्रपट, टी.व्ही. कलावंत), डॉ. पुरुषोत्तम भापकर (आय.ए.एस.), श्रीमती शर्वरी जमेनीस (प्रख्यात अभिनेत्री व नृत्यांगना), श्री. गिरीश लाड (आय.टी. इंजिनिअर व समाजसेवेच्या वेगळ्या मार्गाचा स्वीकार), डॉ. हिमालय पंतवैद्य (डॉक्टर / जादूगार, मुंबई), श्रीमती सुहास जोशी (नामवंत अभिनेत्री रंगभूमी, चित्रपट, दूरदर्शन मालिका), किशोर कदम (कवी सौमित्र) (प्रथितयश अभिनेते, उत्कृष्ट कवी, लेखक), डॉ. चेतना सिन्हा (गांधीवादी - समाजसेविका), आदिनाथ दहिफळे (एम.टेक.), विजय पवार (बी.सी.ए.), नागराज मंजुळे (एम.ए. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक व उत्कृष्ट लेखक), रोहिदास गाडे (उत्कृष्ट चित्रकार), सुमित्रा भावे व सुनील सुखटणकर (चित्रपट दिग्दर्शक, संशोधक, आंतरराष्ट्रीय फिल्म पुरस्कार प्राप्त, टेलिफिल्म निर्माते), सरला शहात्तर काळे (युथ आयकॉन, पोलीस उपनिरीक्षक, शेवगांव), राजकुमार तांगडे (युवा नाट्यलेखक रंगकर्मी), अविनाश बलराम हरड (मुरबाड इतिहास संशोधन मंडळ संस्थापक सदस्य, सामाजिक कार्यकर्ते), राजेश नारायण ठोकळे (प्रोजेक्ट डायरेक्टर – प्रथम – पेस व्होकेशनल स्कील ट्रेनिंग प्रोग्राम), शोभा राऊत (अंपगत्वावर मात करणारी एक कर्तृत्ववान स्त्री).

**– ए. ए. कुलकर्णी,**
अहमदनगर


सुनंदा अमरापुरकर


किशोर कदम (सौमित्र)


सुहास जोशी


नागराज मंजुळे व सदाशिव अमरापुरकर